ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

# शाश्वत विकासात महिलांची भूमिका

*** प्रा. काकासो जे. अनपट**

* सहा. प्रा., श.ता.एज्यू.अँड को ऑप.एज्यू. सोसायटी लिमिटेड संचलित, सिनिअर आर्ट्स महिला महाविद्यालय शहादा, जिल्हा नंदुरबार.

**गोषवारा:**

*शाश्वत विकासामध्ये महिलांची भूमिका बहुआयामी आहे. आज महिलांचा आवाज प्रत्येक आघाडीवर असलेला दिसून येत आहे. आजच्या महिला प्रथम आपल्या कुटुंबाला प्राधान्न देत असतात. महिलांकडे अनेक कल्पना आणि दृष्टिकोन असतात. त्यामुळे त्या अनेक घटकांमध्ये बदल घडवून आणत आहेत. आज स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत. महिलांनी ज्ञान आणि कौशल्याच्या आधारे सर्व क्षेत्र काबीज केली आहेत. आपल्या देशात महिलांना देवीचे रूप मानले जाते. 'यंत्र नार्यस्तू पूज्यते रमन्ते तत्र देवता' या प्राचीन साहित्यातील श्लोकात तिचे महत्त्व अधोरेखित केले आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षणाच्या बाबतीत जागतिक आहे. एकही मुलगी शिक्षणापासून वंचित राहू नये याकडे शासनामार्फत जाणीवपूर्वक लक्ष दिले जात आहे. भारतीय जनगणनेनुसार २०११ मध्ये देशातील एकूण लोकसंख्येच्या महिलांचे प्रमाण पुरुषांबरोबर आहे, म्हणजे भारतात महिलांची संख्या पुरुषांबरोबर आहे त्यामुळे देशाच्या शाश्वत विकासात महिलांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. स्वातंत्र्याचा अधिकार जीवित जगण्याचा अधिकारयांतर्गत महिलांना सुद्धा उत्तम टिपणी जीवन जगण्याचा अधिकार भारतीय संविधानाने महिलांना दिले आहेत. पंचायत राजव्यवस्थेमुळे महिलांना राजकीय व्यवस्थेत सत्ता प्राप्तीची संधी उपलब्ध झाली आहे. त्याचे अनेक महिलांनी संधीचे सोनेदेखील केले आहे त्यामुळे शाश्वत विकास होण्यास मदत झाली आहे.*

**Copyright © 2024 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

## प्रस्तावना:

शाश्वत विकास म्हणजे पर्यावरणपूर्वक विकास होय. शाश्वत विकास म्हणजे भविष्यकालीन पिढ्यांच्या त्यांच्या स्वतःच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेची तडजोड न करता सध्याच्या गरजा पूर्ण करणे होय. दैनंदिन जीवनातील पुरुषांपेक्षा स्त्रियांच्या गरजा वेगळ्या असतात. स्त्रीला कामाच्या ठिकाणी आणि समाजात अनेक कामे आणि जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. आज शाश्वत विकास करण्यामध्ये महिलांचे योगदान अनन्यसाधारण आहे. स्त्री-पुरुष समानतेच्या शिवाय शाश्वत विकास हा साध्य करता येत नाही. शाश्वत विकास साध्य करण्यासाठी महिला सक्षमीकरण हा महत्त्वाचा घटक आहे. सामाजिक विकास आणि पर्यावरणीय स्थिरता हा शास्वत विकासासाठी महत्त्वाचे घटक आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये सतत होणारे शोषण आणि कृषी पद्धती, जलद शहरीकरण. वाढती वाहतूक व्यवस्था. लोकसंख्येचा स्फोट आणि जंगलतोड यांमुळे

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण करणे आवश्यक आहे. सरकार आणि सरकार एजन्सी यांच्याद्वारे शाश्वत विकास करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. सर्व विकसनशील देशांमध्ये स्त्रिया इंधन आणि पाण्याचा पुरवठा करतात, त्या पर्यावरणाची सर्वात जवळून संवाद साधतात. महिलांना नैसर्गिक संसाधनांची रक्षण आणि व्यवस्थापक मानले जाते. शाश्वत विकासामध्ये महिलांची भूमिका नैसर्गिक संसाधनांची न्याय वितरण वाढवण्यासाठी महिला सक्षमीकरणाची गरज महत्त्वाची मानले जाते. शाश्वत विकास ही राजकीय संकल्पना आहे शाश्वत विकास करण्यासाठी पर्यावरण संरक्षण करणे आवश्यक आहे.

**शाश्वत विकासात महिलांची भूमिका:**

गेल्या काही वर्षांमध्ये महिलांची गट आणि संस्था, पर्यावरण निश्चित जागरूकता, शिक्षण आणि संरक्षणासाठी खूप सक्रिय आहेत. जगभरातील शाश्वत विकासात महिला महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत. जगभरातील महिलांना इंधन आणि पाणी पुरवठादार नैसर्गिक संसाधनाची जनक मानले जाते. शाश्वत विकासामध्ये महिलांचे स्थान जगभरात महत्त्वपूर्ण मानले जाते.

**१) कुटुंब नियोजन आणि महिला:**

कुटुंब नियोजन ही शाश्वत विकासाची सर्वात महत्त्वाची बाब आहे. स्त्रिया कुटुंबाचे महत्त्वपूर्ण नियोजक आहेत. कुटुंबव्यवस्थेत महिला स्त्रीला महत्त्वाचे स्थान आहे. कुटुंबाच्या विविध गरजांचे नियोजन महिला करतात त्यामुळे महिलांची कुटुंबातील भूमिका शाश्वत विकासात महत्वपूर्ण आहे. कुटुंब नियोजन म्हणजे केवळ जन्माने येणाऱ्या बालकांच्या संख्येचे नियंत्रण नव्हे तर त्यात पालकात्वाचे शिक्षण, विवाहपूर्व समुपदेशन, मातांना आरोग्य सेवा पुरवणे.

**२) महिला आणि लोकसंख्या**:

वेगाने वाढणारी लोकसंख्या पर्यावरणाच्या ऱ्हासाची प्रमुख घटक आहेत. कुटुंब नियोजनाद्वारे जन्मदर कमी करण्यासाठी स्त्रिया महत्त्वाची भूमिका पार पडतात. जगातील अर्धी लोकसंख्या म्हणजे सुमारे ४९.५८ टक्के लोकसंख्या महिलांची आहे. मुलगी झाली आता काय करू पासून मुलगी शिकली प्रगती झाली, बेटी बचाव बेटी पढाव, मुलींना जन्म देऊ जन्माला येऊ द्या, त्यांना त्यांच्या उभे राहण्याचे सक्षम करा या विचारांनी महिलांनी शाश्वत विकासात आपला वाटा उचलला आहे.

**३) महिला आणि शेती:**

महिलांच्या सन्मानाचा, त्यांच्या उत्कर्षाचा दिवस म्हणून महिला दिवस साजरा केला जातो. प्रत्येक क्षेत्रात आज महिला पुरुषांच्या बरोबर कार्यरत असून त्यांनी शेती क्षेत्रात देखील महत्वाची भूमिका पार पाडली आहे. भारत हा कृषिप्रधान देश

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

असल्याने देशातील कमावते महिलांपैकी ८० टक्के महिलांना शेती क्षेत्रातून रोजगार मिळतो. इतिहासात महिलांचा कृषी व्यवसायातील सहभाग पूर्वीपासून महत्त्वाचा असून ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिलांचे स्थान अतिशय महत्त्वाची आहे. शेतीचा शोध लागला तो एका स्त्रीने आणि आज घडीला बहुतेक ठिकाणी महिला शेतीतील बहुतेक कामे पार पडतात. शेतीचा डोलारा स्त्रियांचा श्रमशक्तीवर तोलला जात आहे. शेतीला शाश्वत विकास करण्यामध्ये स्त्रियांची भूमिका महत्त्वाची आहे. मानवी इतिहासात महिलांचा कृषी व्यवसायात सहभाग प्राचीन काळापासून महत्त्वाचा असून शाश्वत विकासात महिलांचे स्थान महत्त्वाचे आहे. अनेक शतकापासून स्त्रिया शेतीसाठी आपले योगदान देत आहेत, त्यामुळे शेतीचा शाश्वत विकास होत आहे.

**४) महिला आणि पर्यावरण:**

पर्यावरण संवर्धन करण्यात महिला अग्रेसर आहेत. माती, जंगल, पाणी आणि ऊर्जा नैसर्गिक संसाधनांच्या व्यवस्थापनात महिलांची भूमिका महत्त्वाची मानली जाते. महिलांना सभोवताच्या नैसर्गिक जगाचे सखोल पारंपारिक आणि समकालीन वेगवेगळ्या विचारवंतांनी शाश्वत विकासाकडे जाण्यासाठी महिलांनी पर्यावरण यांचा जवळचा संबंध असल्याची म्हटले आहे. ७५ खेड्यातील ५००० महिला पर्यावरणाचा अभ्यास करण्यासाठी महिलांची भूमिका बजावत आहेत. पर्यावरण रक्षण आणि संवर्धन यावर महिला यावर अभ्यास करीत आहेत म्हणून शाश्वत विकासात महिलांची भूमिका महत्त्वाची मानली जाते.

**५) महिला आणि शिक्षण:**

आपल्या देशातील महिलांनी सर्व क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. आज अनेक कायदे, योजना आल्या संविधानही श्री समानतेची तरतूद झाली त्यातून महिला सक्षम झाल्या. आज महिला पुरुषांच्या बरोबरीने काम करत आहेत. शिक्षण क्षेत्रात त्या पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत. महिलांच्या शिक्षणामुळे देश विकसित होतो. स्त्रियांना जो शिक्षणाचा अधिकार मिळालेला आहे त्याचा महिलांनी परिपूर्ण वापर केला आहे. देशाच्या सर्वांगीण विकासातील एक महत्त्वाचा घटक म्हणजे स्त्रीचे शिक्षण होय. पालकांचे शिक्षण जसे वाढत जाते तसे अनेक किमान आठ ते दहा वर्षाच्या शिक्षण घेतलेल्या पालकांच्या मुलांचा मृत्यूदर ८ टक्के नी कमी होतो. वैद्यकीय सेवांचा वापर आणि सुधारित घरगुती आरोग्य सेवा, वागणुकीतील बदलांचे परिणाम तसेच चांगले पोषण, आरोग्यसेवा मिळण्याची क्षमता या गोष्टींमधून त्यांचा शाश्वत विकास होण्यास मदत होते. त्यामुळे शिक्षणाच्या विकासात महिलांची भूमिका महत्त्वाची मानली असल्याचे दिसून येते.

**६) महिला आणि रोजगार:**

अनेक विभागांमध्ये महिला कामगार काम करताना विविध क्षेत्रात महत्त्वाच्या पदांवर आपले वर्चस्व सिद्ध करताना दिसून येत आहेत. शिक्षण व प्रशिक्षणाच्या आधारावर स्त्रियांनी केलेली प्रगती अभिमानास्पद आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजला जाणारा कृषी व्यवसाय अधिक ग्रामीण भागात केला जातो. या व्यवसायावर जवळजवळ ६०% पेक्षा अधिक लोकसंख्या अवलंबून आहे. या व्यवसायात जवळपास ५५% महिलांचा सहभाग पहावयास मिळतो. शेत जमिनीच्या मशागती पासून ते उत्पादन निगेपर्यंत होणाऱ्या सर्वच कामांमध्ये महिलांचा सहभाग असतो. बचत गटामुळे महिलांचा शाश्वत विकास होण्यास मदत झाली आहे. महिलांना बचत गटातून स्वतःचा व कुटुंबाच्या आर्थिक बाजू विकसित करता येतात. यांच्यामध्ये महिलांचे स्वयंसहायता बचत गट हे दारिद्र्यनिर्मूलन, स्वयंरोजगार आणि महिलांच्या आर्थिक सबलीकरणात महत्त्वाची भूमिका बजावतात. R. B. I. च्या पाठिंबातून नाबार्डने सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी ग्रामीण भागात सक्रिय असणाऱ्या मैसूर पुनर्निवारण आणि विकास एजन्सी यासारख्या स्वयंसेवी संस्थांनी बचत आणि कर्ज या तत्त्वाला महत्व देऊन १९८६-८७ मध्ये स्वयंसहायता बचत गट बँक जोडणी प्रकल्पाचा आधार ठरली. जागतिक पातळी महिला रोजगाराचे प्रमाण हे युरोपियन युनियन ५०.८०% युनायटेड स्टेट्स ५६.५ % आरोग्य २३.३ % पाकिस्तान २४.६% चीन ६३.९० % नेपाळ १९.९% भारत २६.७ % श्रीलंका ३५.१ % असे आहे.

**७) महिला आणि उद्योजकता:**

आधुनिक अर्थव्यवस्थेत आज २०२४ मध्ये स्त्री पुरुष समानतेविषयी सहजतेने अभ्यासक आपली मते मांडत असले तरी काही अपवाद वगळता सद्य परिस्थिती अशी बदलली नसली तरी विविध क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. महिला आणि उद्योग यांचा विचार केला तर आज आपल्या देशात महिलांची उद्योगाकडे वळण्याचे प्रमाण वाढू लागले. भारतात ५८% महिला या वयाच्या २० ते ३० च्या दरम्यान उद्योग सुरू करतात ७३ टक्के महिला उद्योजकांची वार्षिक उलाढाल दहा लाखांहून अधिक आहे ५७% पेक्षा जास्त महिला स्वतंत्रपणे एकटीने उद्योग उभा करत असल्याचे दिसून येते. आपल्याकडे महिला या मुख्यत्वे सेवा उद्योग, माहिती तंत्रज्ञान, कापड उद्योग इत्यादी संबंधित उद्योग क्षेत्रात कार्यरत आहेत. या स्त्रियांचा संघर्ष वैयक्तिक जबाबदाऱ्यांपासून सामाजिक पाठिंबापर्यंत आहे. आज जागतिक पातळीवर १२६ मिलियन हून अधिक महिला उद्योगात सक्रिय आहेत. तर भारताचा विचार केल्यास ८ मिलियन हून अधिक महिला उद्योगात सक्रिय आहेत. आज काही महिला उद्योजकांनी उद्योग विश्वात गरुड झेप घेऊन कंपनी स्थापन करण्यापासून ते स्वतंत्र उद्योजिका म्हणून प्रभुत्व प्रस्थापित केले. त्याचे कारण असे की आज महिलांचा उद्योगाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदललेला आहे. उत्तम पायाभूत सुविधा, तंत्रज्ञानाचे ज्ञान व मिळणारा पाठिंबा या काही जमेच्या बाजू उपलब्ध होऊ

लागल्या आहेत. भारतात बेंगलोर, दिल्ली, चेन्नई, मुंबई, हैदराबाद अशा प्रमुख शहरांमध्ये उद्योजक महिलांचे प्रमाण जास्त वाढत आहे. भारतातील यशस्वी उद्योजकांमध्ये ॲलीस डी. वैद्यन यांच्या कंपनीचे वार्षिक उत्पन्न पन्नास हजार कोटी एवढे आहे. आणि डोंगरे अरुंधती, लक्ष्मी अग्रवाल, नीता अंबानी, गीता वर्मा या महिलांनी आपले उद्योग यशस्वी करून दाखवलेले आहेत.

**८) महिला आणि शाश्वत विकास:**

८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. एकविसाव्या शतकातील महिला अधिक शाश्वत विकास निर्माण करण्याकरता तसेच जबाबदारीचे नेतृत्व पार पाडण्याकरता महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. आजच्या स्पर्धेत महिला या पर्यटना बरोबर इतर उद्योगांमध्ये एक महत्त्वाचा घटक आहे. शालेय स्तरावर मुलींची क्रीडा क्षेत्रातील योगदान मोठे आहे. आज महिला प्रत्येक क्षेत्रात स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करत आहेत. शिक्षण, राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा, सहकार, मनोरंजन, प्रशासन, अर्थकारण, सामाजिक कार्य यासारख्या विविध क्षेत्रात आपल्या क्षमतेला न्याय देत आहेत. आज स्त्रियांमध्ये मुळात चिकाटी, कामाचे नियोजन, सातत्य यांसारखे गुण अंगी आहेत. या गुणांना व्यवस्थापन कौशल्याची जोड व आर्थिक सामाजिक पाठीबा मिळाल्यास भारतीय महिलांचा देशाच्या विकास होण्यास मदत होते. भारतात१९९२-९३ मध्ये २५५ बचत गट होते. सध्या महाराष्ट्रात ही संख्या २.५ लाखांपर्यंत आहे. या बचत गटामार्फत विविध प्रकारच्या उपक्रमात रोजगार संधी निर्माण होऊन स्वयंरोजगारात वाढ होत आहे. या बचत गटांमधूनच अधिक शाश्वत विअक्स होण्यास मदत झालेला आहे.

**सारांश:**

भारतीय संस्कृतीमध्ये नारीशक्तीची संकल्पना प्रथम काळापासून आहे. आज महिला या उद्योजकता विकास अभियानामुळे त्यांच्या पायावर उभे राहिले आहेत. पंतप्रधान मुद्रा योजना, STAND UP इंडिया आणि राष्ट्रीय जीवन अभियानांतर्गत तयार झालेल्या महिला बचत गटामुळे महिला सक्षम आणि स्वावलंबी बनल्या आहेत. पंतप्रधान जनधन योजनेमुळे महिलांचे आर्थिक समावेशन झाले आहे. महिलांना सक्षम करण्यासाठी प्रत्येक ठिकाणी त्यांची सुरक्षितता महत्वाची आहे त्यामुळे विकास होण्यास मदत होत आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास निम्म्या महिला आहेत. महिलांच्या विकासामुळे देशाचा आर्थिक विकास झालेला आहे. शासनाने महिलांसाठी आणि महत्त्वाची योजना राबवल्यामुळे त्यांच्या शाश्वत विकास होण्यास महत्त्वाचा वाटा असल्याचे दिसून येते. आज महिला प्रत्येक क्षेत्रात आपल्या विकासाची घोडदोड करत असल्यामुळे त्याच्या विकास झपाट्याने घडून येत आहे. स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यापासून कार्यालयाच्या ठिकाणी त्यांच्या करिअरला उभारणी देण्यापासून सरकारकडून पुढाकार घेण्यात येत आहे. महिला नेत्यांच्या जीवनाच्या प्रवासात सक्षमतेचा अनेक कठोर कायद्याने

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

योजनेच्या अंमलबजावणी केल्यामुळे महिला आपला विकास करून देशाच्या शाश्वत विकासात महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे दिसून येते.

**संदर्भसूची:**


१) वेबसाईट- *https://mr.m.wikipedia.org*

२) *प्रीती सुदान, सातत्यपूर्ण प्रयत्नातून महिला सक्षमीकरण, योजना मासिक, ऑक्टोबर २०१८, पृष्ठ क्र. ४, ५.*

३) *ठाकरे उमेश, शाश्वत विकासासात स्त्रियांची भूमिका, अग्रोवान मासिक २०२३.*

४) *गायकवाड वर्षा, शिक्षणात ही महिलांची सरशी, लोकराज्य योजना मासिक २०२२, पृष्ठ क्र. ८*

५) *Begom Salma Ansar, Role of Women in Sustainable Developmen, Indian Streams Research Journal, ISSN- 2230- 7850, PP- 1-4*

६) वेबसाईट- *https://www.indiawaterportal.org*

७) वेबसाईट-*https://prasidhmarathi.blogspot.com*

८) वेबसाईट- *https://www.mahilahosuingtrust.org*

९) *रोंगटे सुरेखा, आर्थिक विकासात महिलांचा सहभाग, संशोधन पेपर, ISSN- २३४८-७१७३ , फेब्रुवारी- २०१९, पृष्ठ क्रमांक १०*

१०) *शाश्वत भविष्यासाठी अग्रेसर, लोकराज्य मासिक, महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र राज्य, मार्च- एप्रिल 2२०२२ पृष्ठ क्रमांक १२.*


*Cite This Article:*

**प्रा. अनपट का. जे. (2024).** *शाश्वत विकासात महिलांची भूमिका.* In Educreator Research Journal: Vol. XI (Number II, pp. 211–216). **ERJ**. *https://doi.org/10.5281/zenodo.10907960*